*CNR No. MHND240007722023*

## आदेश निशाणी क्र. ०५ वर

**०१.** अर्जदारांनी सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कलम १२५ (२) प्रमाणे दिनांक ०९/०८/२०२३ रोजी दाखल केला आहे. सदर प्रकरणात अर्जदाराने अंतरिम पोटगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. गैरअर्जदाराच्या वतीने प्रस्तुत अर्जावर खुलासा दाखल करुन आक्षेप नोंदविला.

**०२.** अर्जदार व त्यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला, प्रस्तुत अर्ज निकाली काढण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमीमांसा खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदारांनी मागणी केलयाप्रमाणे ते अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अर्जदार हे अंतरिम पोटगी म्हणून दरमहा एकत्रित रूपये ३०००/— मिळण्यास पात्र आहेत. |
| ०२. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ व २ बाबत**

**०३.** अर्जदाराने कथन केले आहे की, तिने गैरअर्जदारविरूध्द कलम १२५ (२) प्रमाणे पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार याने दिनांक ०८/०७/२०२३ रोजी घरातुन हाकलून दिले त्यादिवशी पासून तिच्या माहेरी आईकडे राहत आहे व तिचा सर्व खर्च तिचे आई—वडील करतात. गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हीस व अर्जदार क्र. २ ची उपजिविका भागविण्याचे कोणतेही साधन उपलब्ध करुन दिले नाही व आर्थिक मदत दिली

नाही. अर्जदार यांच्या आई—वडीलांची परिस्थिती अत्यंत गरिबीची असून अर्जदारांचा सांभाळ करणे त्यांना शक्य नाही. त्यामुळे अंतरीम पोटगी मंजुर करावी म्हणुन अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०४.** याउलट गैरअर्जदार हा फायनान्सर आहे. त्याचे वार्षिक उत्पन्न ३,००,०००/— रुपये एवढे असून ५ एकर भिजवणीची शेती आहे. त्यातुन त्यांना वार्षिक उत्तन ४,००,०००/— लाख एवढे आहे. एकुण वार्षिक उत्पन्न ७,००,०००/— कमावतो, त्यामुळे दरमहा वेगळी पोटगी भरण्याची व अर्जदारांना प्रत्येकी ८,०००/— रुपये दरमहा पोटगी गैरअर्जदाराकडुन मिळावी अशी विनंती केली आहे.

**०५.** गैरअर्जदार क्र. १ ने प्रस्तुत अर्जावर खुलास देवुन कथन केले आहे की, गैरअर्जदार हा शेती व मजुरी करून त्यांची व त्यांच्या कुंटूबाची उपजिवीका भागवितो. अर्जदार ही तिच्या माहेरी स्वतःहुन राहत आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांना कुठल्याही प्रकारचा त्रास दिला नसुन तिने त्यांच्याविरुध्द खोटी तक्रार पोलिस स्टेशनला दिली आहे. अर्जदाराच्या माहेरची परिस्थिती ही सधन आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदारास त्रास व्हावा या उद्देशाने दाखल केला आहे.

**०६.** वरील सर्व विवेचनावरुन असे दिसुन येते की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या नांतेसंबधाविषयी कोणताही वाद नाही, गैरअर्जदाराने अर्जदाराच्या नातेसंबंधाविषयीचा मजकुर मान्य केलेला आहे. त्यांच्या कथनावरुन अर्जदार ही त्यांच्यासोबत राहत नाही याचा स्पष्ट बोध होतो. अर्जदार हि तिच्या माहेरी रहाते. त्यामुळे तिला प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास भाग पडले आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदारांनी तिच्या साक्षीपुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. १० वर दाखल केले आहे. परंतु, गैरअर्जदाराने अर्जदाराचा उपटतपास अद्याप घेतलेलो नाही. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या दाईत्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या दाईत्वाच्या शपथपत्रावरुन असे दिसून येते की, तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही तसेच ती गैरअर्जदारावर अवलंबून आहे.

**०७.** प्रस्तुत कायद्याच्या मुळ उद्देशाप्रमाणे अर्जदारास गैरअर्जदाराच्या आर्थिक सामाजिक पातळीप्रमाणे जिवण जगण्याचा अधिकार आहे. प्रस्तुत कायदयाचा मुळ उद्देश हा महिलांचे संवर्धन व संरक्षण हा आहे. त्यामुळे याक्षणी अर्जदार ही तिचे पालण—पोषण करण्यास समर्थ नाही हे प्रथमदर्शणी प्रस्तुत अर्जावरुन दिसून येते. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. ०१ ची पत्नी व अर्जदार क्र.२ हा मुलगा असल्यामुळे त्यांची पालन—पोषन करण्याची सर्वस्वी व कायदेशीर व नैतीक जबाबदारी ही गैरअर्जदाराची आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांचे पालन—पोषण करत असल्याचे कथन केलेले नाही किंवा त्याबाबत त्याने कोणताही प्रथमदर्शणी पुरावा दाखल केलेला नाही. त्यावरुन गैरअर्जदार हे प्रथमदर्शणी अर्जदाराचे पालन—पोषण करत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे गैरअर्जदराने अर्जदारांच्या मुलभूत गरजा पूर्ण न केल्याने अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाला आहे हे प्रथमदर्शणी दिसून येते. त्यामुळे अर्जदार हे कौटुंबिक हिंसाचाराचे पिडीत असल्याचे प्रथमदर्शणी सिध्द होते. सदर प्रकरण हे निर्णीत होण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज निकाली होईपावेतो अर्जदार यांना गैरअर्जदाराकडून आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांना एक मुलगा असून तो अर्जदाराकडे राहतो. त्यामुळे अर्जदारावर त्याच्याही पालन—पोषणाचा भार पडतो. त्यामुळे अर्जदार ही तिच्या मुलाच्या मुलभुत गरजांसाठी लागणारा खर्चसुध्दा गैरअर्जदाराकडून मिळण्यास प्रथमदर्शणी पात्र आहे. वरील सर्व विवेचनावरुन अर्जदार व तिच्या मुलगा हे कौटुंबिक हिंसाचाराचे पिडीत आहेत ही बाब अर्जदाराने प्रथमदर्शणी सिध्द केली आहे. करीत मी या निष्कर्षास येतो व मुद्दा क्र.१ करीता होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ यांच्या कडे शेत जमिन आहे व त्या जमिनीतुन त्यांना वार्षिक ४,००,०००/— रुपयांचे उत्पन येते. तसेच गैरअर्जदार हा फायनान्सचा व्यवसाय करत असून त्यातुन त्यास वार्षिक उत्पन्न ३,००,०००/— रुपयाचे उत्पन्न मिळते. परंतु,

अर्जदाराने त्याबातचा कुठालाही पुरावा अभिलेखावर दाखल केलो नाही. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही प्रथमदर्शणी पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदाराने त्यांच्या मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र दाखल केलेले नाही, सद्यस्थितीत अर्जदाराला अंतरीम आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. त्याकरीता याक्षणी अर्जदाराचे काय उत्पन्न व दायित्व आहे याचा विचार याक्षणी करणे योग्य होणार नाही. त्यामुळे गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचा विचार करता याक्षणी तो अर्जदारांच्या पालन—पोषणाचा खर्च करण्यास समर्थ आहे हे प्रथमदर्शणी सिध्द होते. तसेच अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे आजच्या जीवनातील दैनंदिन गरजा, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या मुलाच्या शैक्षणिक गरजा, अर्जदाराच्या राहणीमान यांचा विचार करता अर्जदार हे गैरअर्जदारकडून ३०००/— अंतरिम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहेत. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५(२) प्रमाणे असा आदेश करण्यात येतो की, गैरअर्जदार याने मुळ अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदारांना दरमहा एकत्रित ३०००/— रुपये या प्रमाणे या प्रकरणांचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी दयावी.

**०३.** गैरअर्जदाराने प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणुन ५००/— रुपये अर्जदारांना दयावी.

**०४.** दोन्ही पक्षकारांना निर्देश देण्यात येतात की, गैरअर्जदाराने अर्जदाराला दिलेल्या कागदपत्राची एक छायांकित प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**०६.** सदर आदेशाची प्रमाणित प्रत गैरअर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

स्वा/—
दिनांक : २०/०९/२०२४ राजेश मो. लोळगे
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
नायगांव बा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.S. Naik |
| Name of Court | : | J.M.F.C. Court, Naigaon |
| Date | : | 20.09.2024 |
| Order signed by the Presiding officer on | : | 20.09.2024 |
| Order uploaded on | : | 20.09.2024 |